# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

## प्रसिध्दीपत्रक

**शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) ऑगस्ट - २०१६ (पुनर्परीक्षा डिसेंबर - २०१६) निकाल.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत ऑगस्ट - २०१६ पुनर्परीक्षा (डिसेंबर-२०१६)मध्ये घेण्यात आलेल्या संगणक टायपिंग प्रमाणपत्र पुनर्परीक्षेचा निकाल मंगळवार दिनांक १४/०३/२०१७ रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात आला आहे. दि. २७/१२/२०१६ रोजी मराठी,हिंदी व इंग्रजी ३० श.प्र.मि. या विषयाची पुनर्परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल विद्यार्थ्यांना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुणपत्रकाची ऑनलाईन प्रिंट घेता येईल.

गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसांत परीक्षार्थीने संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रु. १००/- व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रु. ४००/-ऑनलाईन पध्दतीने बँक ऑफ इंडियाच्या(BOI) खाते क्र. ०५००१०२१००००३५ मध्ये कोणत्याही शाखेत दिनांक २३/०३/२०१७ पर्यंत भरावेत. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत.

### निकालाची संक्षिप्त माहिती

| परीक्षेचे नांव | परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी | उपस्थित | अनुपस्थित | उत्तीर्ण | अनुत्तीर्ण | शेकडा निकाल (उपस्थिती अनुसरुन) |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी ३० | ४२ | १३ | २९ | २ | ११ | १५.३८ % |
| हिंदी ३० | ३ | १ | २ | ० | १ | ५० % |
| इंग्रजी ३० | ३९ | ८ | ३१ | १ | ७ | १२.५०% |
| एकूण | ८४ | २२ | ६२ | ३ | १९ | १३.६४ % |

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१